# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:27.03.2026** **वारः शुक्रवार**

1. पश्चिम आशियातील संघर्षाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी आज विविध राज्यांच्या मुख्यमंत्र्यांशी चर्चा करणार
2. देशभरात इंधन तुटवडा नाही; कच्चं तेल आणि पेट्रोलियम पदार्थांचा 60 दिवसांचा साठा असल्याची केंद्र सरकारची माहिती
3. होर्मुझची सामुद्रधुनी खुली करण्यासाठी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची इराणला आता 6 एप्रिलपर्यंत मुदत
4. संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेत सुधारणा करण्याची तातडीची आवश्यकता असल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर यांचं प्रतिपादन आणि
5. नेपाळचे नवे पंतप्रधान म्हणून राष्ट्रीय स्वतंत्र पार्टीचे नेते बालेंद्र शहा आज शपथ घेणार

**<u>पंतप्रधान</u>**

पश्चिम आशियातील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी आज संध्याकाळी देशातील विविध राज्यांच्या मुख्यमंत्र्यांशी दूरस्थ माध्यमातून संवाद साधणार आहेत. या बैठकीदरम्यान राज्यांची सध्याची तयारी, आपत्कालीन योजना आणि अन्य विविध उपाययोजनांचा आढावा घेतला जाईल. पश्चिम आशियातील संकटाच्या काळात केंद्र आणि राज्य सरकारांमध्ये समन्वय वाढवून या आव्हानाचा सामना एकत्रितपणे करण्याच्या दृष्टीने या बैठकीत विशेष भर दिला जाणार आहे. सध्या पाच राज्यांमध्ये होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकांमुळे आदर्श आचार संहिता लागू असल्यानं या राज्यांचे मुख्यमंत्री या बैठकीत सहभागी होणार नाहीत.

**<u>पेट्रोलसाठा</u>**

संपूर्ण देशभरात एलपीजीचा तुटवडा नसल्याचा सरकारनं पुनरुच्चार केला असून एकंदर 74 दिवस पुरेल एवढी राखीव साठवण क्षमता असल्याचं म्हटलं आहे. कच्चं तेल आणि पेट्रोलियम पदार्थांचा सुमारे 60 दिवसांचा साठा असल्याची माहितीही. केंद्र सरकारनं दिली आहे. देशातलं पेट्रोलियम आणि एलपीजी वितरण सुरळीत तसंच पूर्णपणे नियंत्रणात असल्याचं पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाच्यावतीनं सांगण्यात आलं. जगभरातल्या 41 पुरवठादार देशांमधून भारताला कच्च्या तेलाची आवक वाढली आहे, देशातला प्रत्येक तेलशुद्धीकरण प्रकल्प पूर्ण क्षमतेने सुरू आहे, असंही मंत्रालयानं म्हटलं आहे. तेलशुद्धीकरण प्रकल्पातलं उत्पादन 40 टक्क्यांनी वाढवलं असून दैनंदिन एलपीजी उत्पादन 50 हजार मेट्रिक टन झालं आहे. त्यामुळे नागरिकांनी चुकीच्या माहितीवर विश्वास ठेवू नये असं आवाहन पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयानं केलं आहे. देशांतर्गत उत्पादनाव्यतिरिक्त परदेशांतून 800 हजार मेट्रिक टन एलपीजीच्या पुरवठ्याची खात्रीशीर व्यवस्था करण्यात आली असून अमेरिका, रशिया, ऑस्ट्रेलिया आणि अन्य काही देशांतून एलपीजी घेऊन येणारी जहाजं देशभरातील 22 आयात टर्मिनल्सवर पोहोचण्याच्या मार्गावर आहेत, अशी माहितीही पेट्रोलियम मंत्रालयानं दिली.

**<u>केरोसीन</u>**

आखाती देशांमधल्या युद्धामुळे निर्माण झालेली परिस्थिती लक्षात घेऊन महाराष्ट्र सरकारनं पर्यायी इंधन म्हणून केरोसीन वितरणाला गती देण्याचा निर्णय घेतला आहे. राज्याच्या अन्न आणि नागरी पुरवठा विभागानं याबाबतचा शासन निर्णय जारी केला आहे. केंद्र सरकारनं महाराष्ट्रासाठी ३७ लाख ४४ हजार लिटर केरोसीनच्या वाटपाला मंजुरी दिली आहे. त्यानुसार राज्यात मार्च आणि एप्रिल महिन्यांमध्ये तिन्ही सरकारी तेल कंपन्यांकडून प्रत्येक शिधापत्रिकेमागे 3 लिटर केरोसीनचं वाटप केलं जाणार आहे.

**<u>ट्रम्प होर्मुझ मुदत</u>**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला होर्मुझची सामुद्रधुनी खुली करण्यासाठी दिलेली मुदत 6 एप्रिलपर्यंत वाढवली असून तोपर्यंत इराणच्या ऊर्जा प्रकल्पांवर हल्ले रोखले जातील, असंही ट्रम्प यांनी सांगितलं आहे. दरम्यान अमेरिकी सैन्याच्या आणखी हजार तुकड्या इराणच्या जवळ पोहोचल्या आहेत. इराणचा पाठिंबा असलेल्या हिज्बुलच्या विरोधात लढण्यासाठी इस्त्रायलनं दक्षिण लेबेनॉनमध्ये आणखी तुकड्या पाठवल्या आहेत, तर इराणनं होर्मुझच्या सामुद्रधुनीवरील आपली पकड आणखी घट्ट केली आहे.

इराणकडून इस्रायलवर क्षेपणास्त्रांचा मारा सुरूच आहे. इराणच्या राजधानीसह इतर शहरांवरही मोठ्या प्रमाणात हल्ले झाल्याचं वृत्त आहे.

**<u>पुतीन आखाती युद्ध</u>**

पश्चिम अशियातील संघर्षाचे जगावर कोविड महामारीसारखेच भयंकर परिणाम होण्याची शक्यता असल्याचं रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांनी म्हटलं आहे. पुतीन यांनी काल मॉस्कोमध्ये उद्योग आणि व्यवसाय क्षेत्रातील अग्रणींच्या संघटनेला संबोधित करत होते. अमेरिका आणि इस्रायलनं इराणवर केलेल्या हल्ल्यांमुळे पेटलेल्या या संघर्षामुळे अनेक उद्योग धोक्यात आले असल्याचं पुतीन म्हणाले. सशस्त्र संघर्षाचा सध्याच्या स्थितीवर अत्यंत वेगानं परिणाम होत असून आंतरराष्ट्रीय वाहतूक, उत्पादन आणि पुरवठा साखळीत मोठ्या प्रमाणावर व्यत्यय येत आहे, असंही पुतीन यांनी नमूद केलं.

**<u>झेलेन्स्की</u>**

आखाती भागात सुरू असलेल्या संघर्षाच्या पार्श्र्वभूमीवर होणाऱ्या ड्रोन हल्ल्यांचा प्रतिकार करण्यासाठी युक्रेन पश्चिम आशिया तसंच आखाती भागातील पाच देशांना मदत करत असल्याचं युक्रेनचे अध्यक्ष वोल्दोमीर झेलेन्स्की यांनी अलीकडेच सांगितल्यानंतर काल त्यांचं  सौदी अरेबियामध्ये आगमन झालं. तथापि युक्रेनच्या सरकारी सूत्रांनी झेलेन्स्की यांच्या सौदी अरेबिया भेटीचा अन्य काही तपशील दिलेला नाही. युक्रेनचे सरकारी अधिकारी सौदी अरेबिया, कतार, कुवेत आणि जॉर्डनला त्यांची स्वतःची संरक्षण व्यवस्था उभी करण्यासाठी ड्रोनचा कुशलतेनं वापर करण्याबद्दल मदत असल्याचा झेलेन्स्की यांनी गेल्याच आठवड्यात गौप्यस्फोट केला होता. त्याबदल्यात युक्रेन रशियाविरुद्ध लढण्यासाठी या आखाती देशांकडे असलेली हवाई हल्ल्यांपासून बचाव करणारी अत्याधुनिक क्षेपणास्त्रं मिळवण्याच्या प्रयत्नात आहे.

**<u>जयशंकर-सुरक्षा परिषद</u>**

परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉक्टर एस. जयशंकर यांनी  शांतता प्रस्थापित करण्यासाठी मोहीमा हाती घेण्यासोबतच मानवतावादी पुरवठा साखळ्या बळकट करून संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेत सुधारणा करण्याची तातडीची आवश्यकता असल्याचं स्पष्ट केलं. फ्रान्समध्ये सध्या सुरू असलेल्या जी-7 गटाच्या परराष्ट्र मंत्र्यांच्या बैठकीच्या काल पार पडलेल्या सत्रात जयशंकर यांनी जागतिक प्रशासनाच्या फेररचनेची निकड अधोरेखित केली. अशी माहिती त्यांनी समाज माध्यमावरील संदेशाद्वारे दिली आहे. या बैठकीत सहभागी होण्यासाठी डॉक्टर जयशंकर सध्या दोन दिवसांच्या फ्रान्स दौऱ्यावर आहेत.

**<u>बालेंद्र शपथ विधी</u>**

नेपाळमधील राष्ट्रीय स्वतंत्र पार्टीचे नेते बालेंद्र शहा यांचा आज पंतप्रधान पदाची शपथ घेणार आहेत. स्थानिक वेळेनुसार दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास काठमांडू इथल्या शीतल निवास या राष्ट्रपती कार्यालयात त्यांचा शपथविधी सोहळा होणार आहे. 35 वर्षीय बालेंद्र शहा यांची काल आरएसपीच्या संसदीय पक्षाच्या नेतेपदी निवड करण्यात आल्यानंतर नेपाळचे सर्वात तरुण पंतप्रधान होण्याचा त्यांचा मार्ग मोकळा झाला. 5 मार्चला झालेल्या संसदेच्या निवडणुकीत बालेंद्र शहा यांच्या आरएसपी पक्षानं दणदणीत विजय मिळवला होता

**<u>भारत-युके उच्चायुक्त</u>**

भारतीय परराष्ट्र सेवेतील अधिकारी पेरियास्वामी कुमारन यांची भारताचे ब्रिटनमधील नवे उच्चायुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. कुमारन भारतीय परराष्ट्र सेवेच्या 1992 च्या तुकडीतील अधिकारी असून सध्या ते परराष्ट्र व्यवहार मंत्रालयात सचिव पदावर कार्यरत आहेत. लवकरच ते उच्चायुक्त पदाचा कार्यभार हाती घेण्याची अपेक्षा आहे.

**<u>रामनवमी</u>**

उत्तर प्रदेशातील अयोध्येमध्ये आज रामनवमी उत्सव साजरा होत आहे. श्रीराम जन्मभूमी मंदिरात आज होणारा सूर्य स्नान सोहळा भविकांचं प्रमुख आकर्षण असेल. या सोहळ्याचं दूरदर्शनवरून थेट प्रक्षेपण करण्यात येणार आहे.

**<u>जितेंद्र सिंह</u>**

'आयातीवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी भारत महत्त्वपूर्ण खनिजांचा शोध घेण्याच्या कामाला गती देत असून स्टार्टअप-आधारित खाणकाम परिसंस्थेला प्रोत्साहन देत आहे त्याचबरोबर बळकट देशांतर्गत मूल्य साखळ्या तयार करत आहे,' असं केंद्रीय

विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री डॉक्टर जितेंद्रसिंह यांनी म्हटलं आहे. नवी दिल्ली इथं काल राष्ट्रीय खनिज उत्खनन आणि विकास ट्रस्टच्या नियामक मंडळाच्या बैठकीमध्ये ते बोलत होते. या बैठकीला केंद्रीय कोळसा आणि खाणमंत्री जी. किशन रेड्डी हे ही उपस्थित होते.

**खेलो इंडिया**

छत्तीसगडमध्ये सुरू असलेल्या 'खेलो इंडिया आदिवासी क्रीडा स्पर्धे'च्या दुसऱ्या दिवशी काल जलतरण, भारोत्तोलन, हॉकी आणि फुटबॉल या खेळांच्या स्पर्धा पार पडल्या. कर्नाटकचा जलतरणपटू मणिकांत एल. यानं दोनशे मीटर प्रकारात सुवर्णपदक पटकावत सुवर्णपदकांची हॅट्ट्रिक केली. ओदिशाच्या अंजली मुंडा हिने महिलांच्या 200 मीटर प्रकारात सुवर्णपदक जिंकलं त्यामुळे या स्पर्धेतील तिचं दुसरं सुवर्णपदक निश्चित झालं. पदकतालिकेत कर्नाटक आठ सुवर्ण, तीन रौप्य आणि एक कांस्यपदकासह आघाडीवर आहे तर ओदिशा पाच सुवर्ण, एक रौप्य आणि आठ कांस्यपदकांसह दुसऱ्या स्थानावर आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार